**इंडिया फाउंडेशन फॉर द आर्ट्स (आयएफए)**

**त्यांच्या आर्ट्स प्रोग्रॅम अंतर्गत असणाऱ्या**

कला व्यासपीठे (**Arts Platforms**)

या प्रकल्पासाठी अर्ज मागवत आहे

**अर्ज संपूर्ण वर्षभर स्वीकारले जातील.**

**आर्ट्स प्रॅक्टिस** कार्यक्रम असे प्रकल्प राबवू इच्छितो की जेणेकरून कलाकारांना त्यांच्या सध्याच्या कलानिर्मितीचा पल्ला नवीन दिशेला वाढवता येईल. प्रायोगिकतेचं मूलतत्व पायाभूत ठेऊन, इथे रूढींना आव्हान दिलं जाऊ शकेल, विषयांची, आकृतिबंधांची आणि माध्यमांची व्याप्ती वाढवली जाऊ शकेल, अवकाश, प्रेक्षक आणि समाज यांना खिळवून ठेवण्याचे नवीन मार्ग शोधता येतील.

**कला व्यासपीठे:**

कधी कधी वैचारिक देवाणघेवाणीसाठी, सादरीकरणाच्या नवीन प्रकारांवर चर्चा करण्यासाठी किंवा स्वत:ची कलासाधना निरंतर राखण्यासाठी, ओळखी व्हाव्यात म्हणून, कलाकार मंडळी एकत्र येऊ इच्छितात. ही एकत्र येण्याची इच्छा, त्यांचा स्वतःचा कलाप्रंत सोडून, इतर कलाप्रांतातील एखादी कल्पना राबवण्यासाठी, आपल्या कलाप्रांतात, एक मोठा कालखंड, एकट्यानेच काम करत राहण्यापासून थोडी मुक्ती मिळवण्यासाठी किंवा काही एक राजकीय / सामाजिक परिस्थितीवर कलेच्या माध्यमातून भाष्य करण्याच्या तीव्र इच्छेमुळे, होऊ शकते.

आर्ट्स प्रॅक्टिस कार्यक्रमाच्या अंतर्गत आयोजित केलेल्या **कला व्यासपीठे** कार्यक्रमासाठी, आम्ही अर्ज मागवत आहोत. असे प्रस्ताव, आपापसातील संबंध वृद्धिंगत करण्यासाठी, जे एका कलाप्रांतातील कलाकारांना, वेगवेगळ्या कलाप्रांतातील कलाकारांशी, संबंध प्रस्थापित करण्यासाठी, सृजनात्मकता आणि कलेचा निरंतर प्रवाह कायम राखण्यासाठी, व्यासपीठ उपलब्ध करून देणे, अशा उद्दिष्टांशी निगडीत असावेत.

**प्रकल्प कालावधी:** १२ महिन्यांपर्यंत

**अर्थसहाय्य (Budget):** जास्तीतजास्त रुपये ३,००,०००/- (तुम्ही मानधनासाठी विनंती करू शकता पण मानधन प्रस्तावित बजेटच्या ३०% पेक्षा जास्त असू शकत नाही.)

**कॅलेंडर:** प्रस्ताव, वर्षभर स्वीकारले जातील.

## प्रस्ताव कोण पाठवू शकेल?

या कार्यक्रमांतर्गत प्रस्ताव कोणत्याही प्रांतातील किंवा एकापेक्षा अधिक प्रांतात कार्यरत असणारे पाठवू शकतील. यामध्ये खालील लोकांचा समावेश असू शकतो:

- संगीत, ध्वनी, लेखन, नृत्य, चळवळ, नाट्य, बाहुल्यांचा खेळ, गोष्टी सांगणारे, जादूगार, सर्कस आणि इतर कलाप्रकारातील कलाकार
- चित्रपट (माहितीपट आणि कथेवर आधारित), ॲनिमेशन, छायाचित्रकार, प्रदर्शननिर्माते, नवमाध्यम हाताळणारे, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), यांत्रिकनिर्मिती (robotics), संवादात्मक कलाप्रकार, खेळ, चित्रकला, शिल्पकला, printmaking, कॉमिक्स आणि इतर दृश्यकला प्रकारातील कलाकार.
- संग्राहक (Curators), विशेषकरून जे संग्रहालयाच्याऐवजी इतरत्र बाहेर कार्यरत आहेत ते.
- साहित्याशी निगडीत कवि, कादंबरीकार, नाटककार
- निरनिराळ्या कलाप्रांतात एकत्रितपणे काम करणारे कलाकार

## पात्रता

प्रस्ताव पाठवायची पत्रात भारतीय नागरिकत्व ही आहे. तुमचे प्रस्तावित सहकारीसुद्धा भारतीय नागरिक असणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी, इथे क्लिक करा.

## प्रस्ताव पाठवायची पद्धत

तुम्ही तुमचा प्रस्ताव कोणत्याही भारतीय भाषेत किंवा इंग्लिशमधे लिहू शकता. आयएफए इंग्लिशव्यतिरिक्त भारतीय भाषांमधे लिहिल्या जाणाऱ्या प्रकल्पांना कायम प्रोत्साहित करते.

प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश असावा:

- तुमचे सध्याचे कलाक्षेत्र, त्यांत कलाकार म्हणून तुम्हाला असणारे प्रश्न आणि तुम्हाला असणारे स्वारस्य.
- तुम्हाला जे कला व्यासपीठ तयार करायचं आहे त्याचे तपशील, त्यामागील कारणे आणि या प्रकल्पातील तुमचे भागीदार, सहयोगी यांचे तपशील आणि ज्या ठिकाणी (नेटवर्क/ स्पेस) जिथे तुम्ही ते तयार करू इच्छिता त्याचेही तपशील.
- तुमच्या निर्मितीचे तपशीलवार वेळापत्रक आणि खर्चाचे तपशील.
- तुम्ही आधी केलेल्या कामाचे तपशील.
- तुमचा बायोडाटा, फोन नंबर आणि ईमेल आयडी.

तुम्ही तुमचे प्रश्न आणि कच्च्या संकल्पना, लेखी स्वरूपात, ध्वनी स्वरूपात किंवा चित्रीकरण करून पाठवू शकता; ज्यांवर आयएफएचा स्टाफ प्रतिक्रिया देईल. परंतु, अंतिम प्रस्ताव लिखित स्वरूपात असणे आवश्यक आहे.

तुमचा अंतिम प्रस्ताव, सुमना चंद्रशेखर, प्रकल्प प्रमुख, यांना sumana@indiaifa.org इथे एका ईमेलद्वारे इथे पाठवा. तुम्हाला कोणत्याही शंका असतील किंवा कसलेही स्पष्टीकरण हवे असेल तर कृपया त्यांना इथेच ईमेल पाठवा.

कृपया लक्षात घ्या आयएफए एक असे सुरक्षित वातावरण तयार करण्यासाठी वचनबद्ध आहे जे मुलांसह प्रत्येकाला समर्थन देते, त्यांचा आदर करते आणि त्यांना संरक्षण देते. प्रत्येक अर्जदाराने हे ध्यानात ठेवले पाहिजे आणि या संकल्पनेशी कायम इमान राखले पाहिजे.

आर्ट्स प्रॅक्टिस कार्यक्रम, सोनी पिक्चर्स एंटरटेन्मेंट फंडाच्या, सौजन्याने शक्य झाला आहे.